Historicity Research Journal
Volume 1 | Issue 6 | Feb 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

# मंगळवेढयांच संक्षिप्त इतिहास

अनिता जाधव

बी. ए. भाग - ३ (इतिहास विभाग) , श्रीसंत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.

***सारांश :***

आज संताची भुमी म्हणून मंगळवेढा परिचीत आहे. मंगळवेढयाची ऐतिहासिक व अध्यात्मिक परंपरा फार मोठी आहे. हजारो वर्षापासून या शहराला एक भव्य दिव्य ऐतिहासिक परंपरा लाभलेली असून महाराष्ट्रातील अनेक संत सज्जनांचे सहवास या नगरीला लाभला आहे. त्यामुळे समता व बंधुत्त्वाची शिकवण येथून सुरु झाली. जयतिर्थ टिकाचार्यांचे सुरुवातीचा कालावधीतील वास्तव्य मंगळवेढा येथेच होते.

## ***प्रस्तावना :***

ज्ञानेश्वरांच्या समकलीन आध्यात्मिक लोकशाहीचे प्रणेते चोखोबांनी तर मंगळवेढा आपली कर्मभुमी मानली आणि कुसुखाली आपला देहत्याग केला. मंगळवेढे ही चोखोबाची कर्मभुमी असून ती चोखोबाप्रमाणे दामाजीची कर्मभुमी म्हणून देखील ओळखली जाते.

**उद्दिष्टे :-**

१) मंगळवेढे गावची माहिती लिहिण्याचा एवढाच हेतू की लोकांना या मंगळवेढा शहरात व आसपासच्या प्रदेशात ज्या ऐतिहासिक घटना घडल्या आहेत, त्यावर प्रकाश टाकणे.

२) छ. शिवाजी महाराज व जयसिंगाची भेट मंगळवेढयाच्या किल्ल्यात झाली होती आणि बापू गोखले हे मुळचे मंगळवेढयाचे शिवाजीच्या काळातील परंतु त्यांच्याबद्दल कोणालाच माहिती नाही. याची जाणीव करुन देण्यासाठी ? तसेच संताची सामाजिक कार्य व मंगळवेढयातील मंदिरे यावर प्रकाश टाकणे.

मंगळवेढयाची ऐतिहासिक परंपरा फार प्राचीन असल्याचे दिसते.

**प्राचीन कालखंड :-**

मंगल राजाच्या अगोदर मंगळवेढयाचे प्राचीन नाव जीवनपुरी होते. मंगलाई देवीच्या नावावरुन मंगळवेढा हे नाव पडले असावे अशी अख्यायिका आहे. स्कंदपुराणामध्ये मंगळवेढयाचा उल्लेख मेतुलिंगपुरी असा मिळतो. शालीवाहन शकाच्या सुरुवातीच्या काळात मंगलेश राजाच्या नावावरुन मंगळवेढा हे नाव पडले असावे.

**मध्ययुगीन कालखंड :-**

मध्ययुगीन कालखंडामध्ये बदामीचे चालुक्य, कल्याणीचे चालुक्य या घराण्याचे राज्य मंगळवेढा या नगरावर असल्याचे दिसते. जगदेव मल्ल व महामंडलेश्वर बिज्जल याचा अमंल मंगळवेढयावर असल्याचा दिसतो. देवगिरीच्या यादव वंशानेही काही काळ मंगळवेढयावर अंमल प्रस्थापित केल्याचा उल्लेख मिळतो. आजही अनेक यादवकालीन अवशेष आपणांस मंगळवेढा येथे पहावयास मिळतात. मंदिरे, शिल्पकृती, हेमाडपंथी मंदिराचे अवशेष मंगळवेढयामध्ये पहावयास मिळतात.

**इ.स. १४०० ते १५०० :-**

देवनागरीचे यादव घराण्याचे बहामनी राजाने पराभव केल्यानंतर मंगळवेढे बहामनी राज्यात सामील झाले. बहामनी राज्याचे वेळीइ.स. १४५८ ते १४६० साली महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. यास श्री दामाजी पंताचा दुष्काळ असेही म्हणतात. श्री दामाजीपंता त्यावेळी तेथील तहसिलदार असल्यामुळे भुकेने, दुष्काळाने पीडीत झालेल्या लोकांकरीता त्यांनी धान्याची पेवे लुटविली. त्या करिता बादशहा त्यांना कैद केले असता, पंढरीच्या पांडुरंगाने विठू महाराचे रुप घेऊन दरबारात भरला व श्री दामाजीपंताची सुटका केली. अशी अख्यायिका आहे. मुघल सरकार बहादुर जिलानी याने मंगळवेढा आपपासचा मुलूक जिंकला व मंगळवेढा दिल्लीचे मुघल अंमलाखाली इ.स. १४६५ ते १४७५ पर्यंत होते. इ.स. १४९३ मध्ये मंगळवेढे येथे भुईकोट किल्ला बांधला गेला. हा किल्ला एक प्रमुख व मजबुत लष्करी ठाणे म्हणून प्रसिध्द झाले. बिदर बादशहा महबुब शहा याने स्वारी करुन बहादुर जिलाणीचा पराभव करुन त्यास ठार मारुन मंगळवेढे हे ठाणे पुन्हा जिंकून आपल्या ताब्यात घेतले.

इ.स. १३९६ ते १४०८ अशी बारावर्षे दुर्गा देवीचा दुष्काळ या भागात पडला. त्यात मंगळवेढे ही सापडले नंतर इ.स. १४२२ ते १४२३ आणि इ.स. १४६७ ते १४७४ या साली दोन मोठे दुष्काळ पडून मंगळवेढे गावाची वाताहात झाली. लोक गांव सोडून गेले, देश हैराण झाला. २० वर्ष मंगळवेढे व आसपासची गावे ओसाड राहिली, गावात थोडीच लोक येथे वास्तव्यास राहीली म्हणून इतर गावातून व दूरवरुन मोठी घराणी येथे वास्तव्यास आणून त्यांना जमिनी देवून पुन्हा वसाहत करावी लागली. या लोकापैकी नांगावाचे प्रतापरुद्र इंगळे यांना आणून देशमुखी करुन दिली.

आलूर अचालेरे येथून भानशेट होनराव यास आणून देशमुखाच्या तीन तक्षिमा करुन दिल्या. अनग येथून कोयाजी बीन नागदेव यास आणून देशमुखाच्या चार तक्षिमा केल्या. विठ्ठल कसगावडा, चंडरस कुलकर्णी ही घराणी गावातच होती, त्यांना पाटील कुलकर्णी वतने दिली. इतर गावांहून खालील फुगारे, भगरे, हजारे, जठार,उन्हाळे, कोंडुभैरी, धावलींग, मुरडे, ताड, टकले, आयवड, शहाजादे, कानू, इंगळे, तानगावडे, तिपनाईक, कसगावडे, गवळी, चौगुले, नाडगौडा, बोदले, जोगन, जावळे, बहिरजी, ढवण, जोशी, काटकर, घाटूळ, घुले, चौधरी, महाजन, खराडे, वाकडे, भांगे, आवताडे, उमाडे, गुंगे, मुदगुल, बोमन्ना, वठारे, यादवाडाचे होनमाने इ. घराणे मंगळवेढयाला आली. या लोकांना ज्या ज्या भागात जमिनी दिल्या तेथील झाडी तोडून जंगल साफ करुन त्यांनी शेती केली. त्या त्या स्थळाला त्यांची नावे दिली. असून आजही मंगळवेढे शिवारातील जमीन अमक्या स्थळात आहे अशी ओळखली जाते. सर्व स्थळे मिळून ७२ भागात मंगळवेढयाची जमीन वाटली गेली आहे. इ.स. १४८९ मध्ये मंगळवेढा गाव जिंकून विजापूरच्या आदिलशहाने आपल्या राज्यात सामील केले.

**इ.स. १७०० ते १८०० :-**

इ.स. १७०० नंतर मोगल अंमल संपून हा किल्ला मराठयांच्या ताब्यात आला. श्री छत्रपती शाहू महाराज यांनी पांढरे यांना प्रमुख नेमले. इ.स. १७०८ ते १७४२ पर्यंत त्यांचा अंमल होता. त्यांनी सध्या उभी असलेली चौबुर्जी इ.स. १७२० ते १७३० या काळात बांधल्याचा उल्लेख मिळातो. ही चौबुर्जी मुख्य किल्ल्यातील आतील बालेकिल्ला आहे. तो चौकोनी असून प्रत्येक बाजुची लांबी २३० फुट आहे. भिंत १८ फुट उंच असून १८ फुट रुंद आहे. त्यास रणमंडल रहाटभुत व

बडेखान असे चार बुरुज असून ते २५ फुट लांब व ३० फुट व्यासाचे आहेत. तटाचे रणमंडळ बुरुजावर तास वाजवीत असत. म्हणून त्या बुरुजास तासबुरुज असे म्हणू लागले. सध्या करंदीकर वकील राहतात त्यांच्या घराजवळील हा रणमंडळ बुरुज होय. इ.स. १७४२ ते १७५० पर्यंत पंतप्रतिनिधीचा अंमल असून यमाजी शिवदेव हे येथे सरदार होते. इ.स. १७५० पासून प्रथम कामवीसदार म्हणून मंगळवेढयास आले नंतर गोंविद हरी पटवर्धन यांना संरजाम हा किल्ला इ.स. १७५१ साली दिला गेला. पटवर्धनाची मिरज व मंगळवेढे हे दोन महत्वाचे किल्ले होते. गोविंद हरी पटवर्धन यांच्यावर पेशवे दरबाराची इतराजी झाली त्यावेळी मंगळवेढे येथे किल्ल्यात येऊन राहिले होते. त्यावेळी त्यांनी श्री संत दामाजी मंदिरात सेवा केली. म्हणून त्यांना त्यांच्या कृपाप्रसादामुळे जहागीर परत मिळाली. अशी त्यांची श्रध्दा होती. पुरुषोत्तम दाजी पटवर्धन हे मध:शाम यांचे नातू होते. ते मंगळवेढे येथे राहत होते.इ.स. १७५५ साली श्रीमंत नानासाहेब पेशवे, श्रीमंत भाऊसाहेब व श्रीमंत दादासाहेब पेशवे हे मंगळवेढा येथे येऊन काही दिवस राहिले असल्याचा उल्लेख मिळतो. त्यावेळी मंगळवेढे परगणा होता व आंबेगांव (सध्या आंबे, चळे म्हणून असलेले गाव) मंगळवेढे परगण्याखाली होते. तो गाव त्यावेळी श्रीमंत पेशव्यांनी नारायणकृष्ण व पुरुषोत्तम कृष्ण यांना इनाम करुन दिला. श्री पुरुषोत्तम दाजी हे श्रीमंत नारायणराव पेशवे याचा खुन झाला त्यावेळी मंगळवेढयास राहत होते.

**इ.स. १८०० ते १९०० :-**

इ.स. १८०० ते १९०० मध्ये पटवर्धन घराण्याच्या वाटण्या होवून मंगळवेढे श्रीमंत चिंतामनराव, आप्पासाहेब, सांगलीकर पटवर्धन यांचे वाटणीस आले. इ.स. १८१८ मध्ये मंगळवेढयाहून १३ मैलावर असलेल्या आष्टी गावी शेवटची मराठा -इंग्रज यांच्यात लढाई होऊन मराठा साम्राज्य लयास गेले. पेशवे बाजीराव व्दितीय यांचा सेनापती बापु गोखले हे धारातिर्थी पडला. आजही मंगळवेढे शहरात सेनापती बापु गोखले यांचा वाडा पडक्या अवस्थेत आहे. श्री संत चोखामेळा चौकातून पूर्वेस मारवाडी गल्लीतून थोडे पुढे गेले असता आपणास उजव्या हातास तो वाडा असलेला दिसतो. आपल्या तलवारीचे तिखट पाणी इंग्रजास पाजून मराठी साम्राज्य टिकविण्याची खटपट करणारा हा शुर योध्दा मंगळवेढे येथे राहत होता. याचा अभिमान मंगळवेढा जनतेस आज पाहिजे पण मंगळवेढयाची जनता बापू गोखले यांना आज विसरली आहे. त्यांचे शहरात कोठेही स्मारक नाही. मराठी राज्य गेले पण महाराष्ट्राचे मन इंग्रजांनी संपूर्ण मारलेले नव्हते. इ.स. १८५७ साली उत्तर भारतात स्वातंत्र्याच्या पहिला प्रयत्न होताच त्याचे पडसादही मंगळवेढे उमटलेले दिसतात. या उठावात काही प्रत्यक्ष कृती करत होते. इंग्रज सरकार संशयावरुनही पकडून लोकांना त्रास देत होते. स्वातंत्र्य युध्दात भाग घेतला म्हणून मंगळवेढयाहून श्री. नारायणराव नाना पटवर्धन, भास्करराव जमखंडीकर, आलमसाहेब काझी व एक मराठी गृहस्थ यांना ता. १/१२/१८५७ रोजी पकडून सातार येथे चौकशी करिता नेले. पण नंतर त्यांना सोडून देण्यात आले. चिंतामणराव, आप्पासाहेब नंतर श्रीमंत धोंडीराज तात्यासाहेब हे सांगली संस्थानाचे अधिपती झाले. त्यांना १८५९ साली मुखत्यारी आली. त्यांच्या कारकीर्दीत सांगली संस्थानाचा कारभार काही वर्षे ब्रिटीश सरकारच्या अंमलाखाली होता. इ.स. १८७६ पर्यंत हा किल्ला मजबुत स्थितीत होता. सांगली संस्थानात ब्रिटीश ऍडमिनिस्ट्रेशन आल्यामुळे जॉईट ऍडीमनिस्ट्रेशन कॅप्टन बेस्ट यांनी किल्ल्याचे दरवाजे कायमचे पाडले व मेजर वॉलरने तट पाडला. तटाची माती व दगड लोकांनी नेले व खंदक ही बुजवले गेले काही बुरुज पडले काही बुरुज मुद्दाम पाडले गेले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र राष्ट्र झाले १९ फेब्रुवारी १९४८ रोजी ज्यावेळेस सांगली संस्थानचे भारतात विलीनीकरण झाल्यानंतर मंगळवेढे हे शहर सोलापूर जिल्हयातील एक तालुका झाला.

**निष्कर्ष :-**

प्राचीन काळांपासून अनेक राजवंशाचा अंमल मंगळवेढा या शहरावर होता. इ.स. १४०० ते १५०० या काळामध्ये मंगळवेढे या गावावर बाहमनी राज्याचे राज्य होते. यावेळीच संत दामाजी हे संत होऊन गेले. त्यांनी दातृत्वाची दिक्षा या भूमीला दिली. इ.स. १७०० ते १८०० या काळामध्ये मंगळवेढयातील किल्ल्यावरील मोघल अंमल संपुन तो किल्ला मराठयांच्या ताब्यात आला. हा किल्ला तासबुरुज म्हणून ओळखला जातो. या काळात नानासाहेब पेशवे, श्रीमंत बापुसाहेब

व श्रीमंत दादासाहेब पेशवे हे येथे काही दिवस राहिले होते. यावरुन मध्यकालखंडामध्ये सुध्दा इतिहासाच्या दृष्टीने मंगळवेढा शहर अतिशय महत्वपूर्ण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पावन स्पर्श या भूमीला झालेला आहे. मंगळवेढा भूमीमध्ये इ.स. १४०० - १९०० या कालखंडात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या. असल्यामुळे मंगळवेढयाचा इतिहास हा महत्वाचा आहे म्हणून त्यावर आणखी संशोधन करण्याची गरज आहे.

**संदर्भग्रंथ :-**

*१) Maharashtra State Gazetter Solapur District, 1989.*
*२) District Census Handbook Solapur , 1991*
*३) आवताडे.ना.व्यं. श्री.संत दामाजी चरित्र, श्री.संत दामाजी संस्था, मंगळवेढा.*
*४) इंगवले कृष्णा जोतिराम, माणदेश : स्वरुप आणि समस्या, माणगंगा प्रकाशन, सांगोला, प्रथम आवृत्ती १९८८.*
*५) मंगळवेढा तीर्थक्षेत्र विकास आराखडा, मंगळवेढा नगरपरिषद मंगळवेढा, सन २००४-०५.*
*६) गोपाळ मारुती देशमुख, सोलापूर जिल्हयाचा इतिहास (मराठा कालखंड) भाग १, रेवु प्रकाशन, पंढरपूर, २००९.*
*७) आपटे गोविंद विनायक, संस्थानिक : पटवर्धन घराण्याचा इतिहास भाग १, १९१९.*
*८) Bombay Presidency Gazetter of Solapur District Vol.XX 1884.*



**अनिता जाधव**
बी. ए. भाग - ३ (इतिहास विभाग) , श्रीसंत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.